सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एपीओ-३५२५/प्र.क्र.३८/पोल-३, दि. २४/०७/२०२५.

**विषय :-** पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर, नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ इमिग्रेशन चेक पोस्ट करिता एकूण २८५ पदे नव्याने निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एपीओ-३५२५/प्र.क्र.३८/पोल-३,दि. २४/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७२४१७०९३५८९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 27-07-2025 20:58:38

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, नवी मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-ब.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(पुनर्रचना).

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ इमिग्रेशन चेक पोस्ट करिता एकूण २८५ पदे नव्याने निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एपीओ-३५२५/प्र.क्र.३८/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : २४ जुलै, २०२५.

<u>संदर्भ</u> :-

१.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/नवी मुंबई विमानतळ /इमिग्रेशन चेक पोस्ट/१८/२०२५, दि.०५.०३.२०२५

२.उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १४.०७.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे दि.१७.०७.२०२५ रोजीचे कार्यवृत्त.

<u>प्रस्तावना</u> :-

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ फेज ०१ चे उद्घाटन प्रस्तावित आहे. संपूर्ण विमानतळ परिसरामध्ये ०४ प्रवासी टर्मिनल, ०२ रनवे, ०१ कार्गो ट्रक टर्मिनल व इतर महत्वाच्या संरक्षण व नागरी हवाई वाहतूक विभागाशी संबंधीत आस्थापना कार्यान्वित होणार आहेत. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यक्षेत्रात आंतरराष्ट्रीय विमानतळाचा भुमीपूजनाचा कार्यक्रम मा.श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत सरकार यांच्या हस्ते दि.१८/०२/२०१८ रोजी कोंबडभुजे येथे पार पडला असून पनवेल शहर पोलीस ठाणे आणि उलवा पोलीस ठाणे या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सिडको प्रशासनाने १) उलवे, २) गणेशपुरी, ३) तरघर, ४) कोंबडभुजे, ५) वाघीवलीगांव, ६) वाघीवलीवाडा, ७) वरचे ओवळा, ८) कोपर ९) कोल्ही, १०) चिंचपाडा या गावांची जमीन संपादीत केलेली असुन त्या ठिकाणी नवीन विमानतळाचे काम प्रगतीपथावर आहे.

विमानतळ पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर ३६० कोटी मेट्रिक टन प्रती वर्ष मालाची व ०९ कोटी प्रवासी प्रती वर्ष याप्रमाणे वाहतूक नियोजित आहे, सबब पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने संदर्भाधीन क्र.१ येथे नमूद पत्रांद्वारे पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ इमिग्रेशन चेक पोस्ट करिता एकूण २८५ पदे नव्याने निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणा-या आवर्ती खर्चास मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>:-**

१. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ इमिग्रेशन चेक पोस्ट करिता या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील एकूण २८५ नवीन पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पदनिर्मितीस व त्याकरिता येणाऱ्या रु.१०,१०,८८,०००/- (अक्षरी रु. दहा कोटी दहा लाख अठ्ठ्याऐंशी हजार फक्त) इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उक्त शासन निर्णय हा संदर्भीय क्र.२ येथील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०७२४१७०९३५८९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.07.24 17:10:23 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

मा.मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, नवी मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
निवड नस्ती, पोल-३.

**शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एपीओ-३५२५/प्र.क्र.३८/पोल-३**

दिनांक : २४ जुलै, २०२५ चे सहपत्र.

**"परिशिष्ट-अ"**

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ इमिग्रेशन चेक पोस्ट करिता निर्माण करावयाची विविध संवर्गातील एकूण २८५ नवीन पदे

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | एस-१८ : ४९१००-१५५८०० | २० |
| २ | पोलीस उप निरीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ५५ |
| ३ | सहायक पोलीस उपनिरीक्षक | एस-१० : २९२००-९२३०० | ३० |
| ४ | पोलीस हवालदार | एस-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | ६० |
| ५ | पोलीस शिपाई | एस-७ : २१७००-६९१००+ विशेष वेतन रु.७५०/- | १२० |
| | **एकूण** | | **२८५** |